# प्रेसनोट

नाशिक,
दि. २३/०३/२०२२

**आरोपी दत्ता मारुती घोडे,कंत्राटी अस्थाई शिपाई, नेमणुक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ नाशिक, जि.नाशिक यांनी ३,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | कार्यवाही सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | दत्ता मारुती घोडे,कंत्राटी अस्थाई शिपाई, नेमणुक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ नाशिक, जि.नाशिक |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | ३,०००/— रूपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ३,०००/— रूपये |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांचा मुलगा सुशिक्षित बेरोजगार असून त्यांने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. नाशिक यांचेकडे सुशिक्षित बेरोजगार योजनेअंतर्गत टाटा एस (छोटा हत्ती) हे माल वाहतुकीचे वाहन व्यवसायासाठी खरेदी करण्याकरीता ४,७१,४०१/—रुपये कर्ज मिळणेसाठी अर्ज केला आहे. त्या अनुषंगाने आरोपी खाजगी इसम दत्ता मारुती घोडे, कंत्राटी अस्थाई शिपाई, नेमणुक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ नाशिक, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांना महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. नाशिक कार्यालयात माझी ओळख असून सदर कर्ज मंजुर करुन मिळवून देण्यासाठी ३,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br><br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने सापळापुर्व पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आरोपी खाजगी इसम दत्ता मारुती घोडे, कंत्राटी अस्थाई शिपाई, नेमणुक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ नाशिक, जि.नाशिक यांनी पंच व साक्षीदारांसमक्ष तक्रारदार यांचेकडे ३,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आज दि.२३/०३/२०२२ रोजी समाज कल्याण विभाग नाशिक कार्यालयाचे आवारातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. नाशिक कार्यालयासमोर स्विकारली असतांना त्यांना पकडण्यात आले असून त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in
ई—मेल :— spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :— acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :— १०६४
दुरध्वनी क्रमांक :— ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :— ९९३०९९७७००

(सतिश भामरे)
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.